# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
# कृषि नगर, अकोला ४४४ ००१

वाचा - शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१५२५/प्र.क्र.१९९/१६ अ (ई-१८५२२४३) दिनांक १७ सप्टेंबर २०२६.

विषय: दि. १७ संप्टेंबर, ते दि. १७ आक्टोंबर, २०२६ या कालावधीत राबविण्यात येणा-या राज्यव्यापी सेवा संकल्प अभियान अंतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत विविध उपक्रम राबविणेबाबत.

## परिपत्रक:-

जा. क्र. साप्रवि/ सेवासंकल्प/अभियान/2478/२०२६ दि २१/०९/२०२६

उपरोक्त शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व संबंधित कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख, सहयोगी अधिष्ठाता व त्यांचे अधिनस्थ सर्व आस्थापनांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये दि. १७ सप्टेंबर २०२६ ते दि. १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यामध्ये "सेवा संकल्प अभियान" राबविण्यात येत आहे. सदर अभियानाच्या अनुषंगाने कृषी क्षेत्राशी संबंधित शेतकरी, ग्रामीण युवक, महिला, कृषी उद्योजक तसेच इतर संबंधित घटकांपर्यंत कृषी तंत्रज्ञान, शासकीय योजनांची माहिती, कृषी विषयक मार्गदर्शन व विद्यापीठाच्या विविध सेवांचा प्रभावीपणे लाभ पोहोचविणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने या विद्यापीठात सुध्दा विविध उपक्रम राबवायचे आहेत. संदर्भीय परिपत्रकात कृषि क्षेत्र हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्वाचा आधार असल्याने, राज्यातील कृषि विद्यापीठे, त्यांची संलग्न महाविद्यालये, कृषि तंत्रविद्यालये संशोधन केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे व विस्तार शिक्षण यंत्रणेमार्फत शेतकरी, ग्रामीण युवक, महिला व कृषि क्षेत्राशी संबंधित घटकांपर्यंत कृषि तंत्रज्ञान, शासकीय योजनांची माहिती व विविध सेवा राबविण्यात याव्यात असे शासन निर्देश प्राप्त आहेत.

करीता सदरहु उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल तयार करून विद्यापीठाचे नियुक्त करण्यात आलेले नोडल अधिकारी यांचेकडे नियंत्रण अधिकारी यांचेमार्फत सादर करावा. तसेच सदर अभियान दि. १७ सप्टेंबर २०२६ ते दि. १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांची राहील. सर्व संबंधितांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करून अभियानाच्या उद्दिष्टांची पूर्तता करावी. **तसेच सुलभ संदर्भा करीता शासन परिपत्रकाची प्रत यासह संलग्न करण्यात येत आहे. सदर बाबीस सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.**

सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे तात्काळ अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्व नियंत्रण अधिकारी व कार्यालय प्रमुख यांची राहील.

उपरोक्त आदेश विद्यापीठ हितार्थ निर्गमित करण्यात येत असून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

मा. कुलगुरु महोदय यांचे मंजुरीने निर्गमित.

स्वा/-
प्रिती रोडगे,
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी माहीती व उचित कार्यावहीकरीता.

१. संचालक शिक्षण /संशोधन/विस्तार शिक्षण डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
२. अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व)------------------------------------------------
४. विभाग प्रमुख (सर्व)------------------------------------------ डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
५. प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय, (सर्व) ------------------------------------------------
६. प्रभारी अधिकारी कृषि संशोधन केंद्रे (सर्व) ------------------------------------------

जा. क्र. साप्रवि/ सेवासंकल्प/अभियान/2578/२०२६
दि २१/०९/२०२६

७. वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषि विज्ञान केंद्रे (सर्व) ----------------------------------------

८. नियंत्रक,/विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यार्थी कल्याण अधिकारी. पं.दे.कृ. वि., अकोला.

९. मा. कुलगुरुंचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहीतीकरीता.

१०. उपकुलसचिव आस्थापना / सामान्य प्रशासन विभाग / वि.वि. डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला

उपकुलसचिव (साप्रवि.)
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

दि.१७ सप्टेंबर २०२६ ते दि.१७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत, राबविण्यात येणाऱ्या राज्यव्यापी "सेवा संकल्प अभियान" अंतर्गत, महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांमार्फत विविध उपक्रम राबविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषी विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-१५२५/प्र.क्र.१९९/६अे (ई. क्र. १८५२२४३)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ सप्टेंबर, २०२६

**संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सेसंअ-२०२६/प्र.क्र.९५/रवका-२, दि. ०९ सप्टेंबर २०२६.**
**२) कृषी विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१२१/३-अ (ई-१८४७६११), दि.११ सप्टेंबर, २०२६.**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दि. १७ सप्टेंबर २०२६ ते दि. १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात, "सेवा संकल्प अभियान" राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अभियानामध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ, सेवा व माहिती प्रभावीपणे उपलब्ध करून देणे, नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे, सामाजिक सहभाग वाढविणे, स्वच्छता व जलसंधारण याबाबत जनजागृती करणे, तसेच, शासकीय योजनांमुळे झालेल्या सकारात्मक बदलांच्या यशोगाथा नागरिकांपर्यंत पोहोचविणे यावर भर देण्यात आला आहे.

कृषी क्षेत्र हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असल्याने, राज्यातील कृषी विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये, संशोधन केंद्रे, कृषी विज्ञान केंद्रे व विस्तार शिक्षण यंत्रणेमार्फत शेतकरी, ग्रामीण युवक, महिला व कृषी क्षेत्राशी संबंधित घटकांपर्यंत कृषी तंत्रज्ञान, शासकीय योजनांची माहिती व विविध सेवा पोहोचविणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) **<u>शेतकरी सेवा व मार्गदर्शन शिबिरे</u>:-**

- कृषी विद्यापीठांनी आपल्या कार्यक्षेत्रातील जिल्हे/तालुके/गावे येथे संबंधित विभागांच्या समन्वयाने शेतकरी सेवा व मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करावे.

- या शिबिरांमध्ये पुढील बाबींवर मार्गदर्शन करण्यात यावे :-

अ) केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विषयक योजनांची माहिती ;

आ) पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक अर्ज प्रक्रिया व कागदपत्रांबाबत मार्गदर्शन ;

इ) सिंचन, विहिरी, पाणी व्यवस्थापन व जलसंधारणाशी संबंधित योजनांची माहिती ;

ई) शेतकरी प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन ;

उ) ७/१२ व ८-अ अभिलेख अद्ययावत ठेवण्याबाबत जनजागृती ;

ऊ) पीक उत्पादन, कीड व रोग व्यवस्थापन, मृदा आरोग्य, पाणी व्यवस्थापन व कृषी यांत्रिकीकरणाबाबत तांत्रिक मार्गदर्शन ;

ऋ) कृषी विद्यापीठांनी विकसित/शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाचे शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन.

२) <u>कृषी नवोपक्रम व स्टार्टअप उपक्रम</u>:-

- कृषी विद्यापीठांनी विद्यार्थी, संशोधक, युवा शेतकरी, स्टार्टअप, इनक्युबेशन सेंटर,कृषी उद्योजक व नवोपक्रम करणाऱ्या व्यक्तींना सहभागी करून घेऊन कृषी नवोपक्रम उपक्रम/इनोव्हेशन चॅलेंज आयोजित करावे.
- यामध्ये पुढील बाबींना प्रोत्साहन द्यावे :-

  अ) शेतकऱ्यांच्या स्थानिक समस्यांवर आधारित नवोपक्रम ;

  आ) कृषी तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक ;

  इ) कृषी प्रक्रिया व मूल्यवर्धन;

  ई) कृषी व्यवसाय व उद्योजकता;

  उ) डिजिटल कृषी व तंत्रज्ञानाचा वापर;

  ऊ) ग्रामीण भागातील रोजगारनिर्मितीच्या संधी.

३) <u>"सेवा माझे योगदान" अंतर्गत सामाजिक उपक्रम</u>:-

- कृषी विद्यापीठे व त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांनी आपल्या परिसरातील गावांमध्ये स्थानिक गरजेनुसार किमान एक किंवा अधिक सामाजिक उपक्रम राबवावेत.
- यामध्ये पुढील उपक्रमांचा समावेश करता येईल :-
- वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन.
- स्वच्छता अभियान.
- जलसंधारण व जलस्रोत स्वच्छता.
- प्लास्टिकमुक्ती जनजागृती.
- कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंग.
- ग्रामीण युवकांसाठी करिअर मार्गदर्शन.
- डिजिटल साक्षरता.
- महिला आरोग्य व स्वच्छता जनजागृती.
- विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहकार्य.
- शासकीय योजनांची जनजागृती.
- सायबर सुरक्षा जागरूकता.
- अवयवदान संकल्प अभियान.
- व्यसनमुक्त भारत जागरूकता.
- रस्ते सुरक्षा जागरूकता.
- विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी सर्व प्रमाणपत्रे.

४) <u>जलसंधारण व शाश्वत शेती जनजागृती</u>:-

कृषी विद्यापीठांनी विशेषतः पुढील विषयांवर शेतकरी जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत :-

- पाण्याचा कार्यक्षम वापर.
- सूक्ष्म सिंचन.

- पावसाचे पाणी साठवण.
- मृद व जलसंधारण.
- जलस्रोतांचे संवर्धन.
- हवामान अनुकूल शेती.
- पीक विविधीकरण.
- नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर.
- शक्य असल्यास, विद्यापीठाचे प्रक्षेत्र, संशोधन केंद्रे, कृषी विज्ञान केंद्रे व निवडक शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आयोजित करावीत.

५) <u>विद्यार्थी सहभाग व ग्रामभेटी</u>:-

कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा "सेवा संकल्प अभियानामध्ये" सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा. विद्यार्थ्यांमार्फत :-

- गावभेटी.
- शेतकरी संवाद.
- कृषी तंत्रज्ञान प्रात्यक्षिके.
- शेतकरी जनजागृती.
- स्वच्छता व वृक्षारोपण.
- कृषी नवोपक्रम प्रदर्शन.
- ग्रामीण युवकांसाठी करिअर मार्गदर्शन यांसारखे उपक्रम राबविण्यात यावेत.
- विद्यार्थ्यांना स्थानिक कृषी समस्या ओळखून त्यावर व्यवहार्य उपाय सुचविण्यास प्रोत्साहित करावे.

६) <u>कृषी तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक व प्रसार</u> :-

- कृषी विद्यापीठांनी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुधारित कृषी तंत्रज्ञानाचे शेतकरी मेळावे, प्रात्यक्षिके, तंत्रज्ञान प्रदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत.

- यामध्ये विद्यापीठाने विकसित केलेले किंवा शिफारस केलेले पीक तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, मृदा व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, कृषी यांत्रिकीकरण व मूल्यवर्धनाशी संबंधित तंत्रज्ञान यांचा समावेश करता येईल.

७) **कृषी व ग्रामीण विकास विषयक जनजागृती** :-

कृषी विद्यापीठांनी शेतकरी, ग्रामीण युवक, महिला व विद्यार्थ्यांसाठी पुढील विषयांवर व्याख्याने/ कार्यशाळा आयोजित कराव्यात :-

- आधुनिक व शाश्वत शेती.
- कृषी उद्योजकता.
- कृषी प्रक्रिया व मूल्यवर्धन.
- कृषी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी.
- शासकीय योजनांची माहिती.
- हवामान बदल व शेती.
- जल व मृदा संवर्धन.
- डिजिटल कृषी.

८) **"विकसित भारत" विषयक कृषी उपक्रम:-**

- विद्यार्थ्यांसाठी "विकसित भारत" या संकल्पनेशी संबंधित कृषी विषयांवर निबंध, वक्तृत्व, पोस्टर, चित्रकला, प्रदर्शन व चर्चासत्रे आयोजित करता येतील.
- विशेषतः "विकसित भारतासाठी कृषी क्षेत्राची भूमिका", "युवा व कृषी नवोपक्रम", "शाश्वत शेती" यांसारख्या विषयांना प्राधान्य देता येईल.

९) **"बदलाची गोष्ट" - यशोगाथा संकलन:-**

- कृषी विद्यापीठांनी त्यांच्या संशोधन, विस्तार शिक्षण व कृषी तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे लाभ झालेल्या शेतकऱ्यांच्या यशोगाथा संकलित कराव्यात.
- प्रत्येक यशोगाथेसाठी शक्य असल्यास :

- लाभार्थी शेतकऱ्याचे नाव व गाव.
- राबविलेल्या तंत्रज्ञान/उपक्रमाची माहिती.
- झालेला सकारात्मक बदल.
- छायाचित्रे.
- लघु व्हिडिओ/रील, यांचे संकलन करावे.

१०) <u>प्रसारमाध्यमे व डिजिटल दस्तऐवजीकरण:-</u>

अभियानांतर्गत आयोजित प्रत्येक महत्त्वाच्या उपक्रमाचे योग्य प्रकारे दस्तऐवजीकरण करावे. त्यासाठी :-

- छायाचित्रे.
- व्हिडिओ.
- लघु व्हिडिओ/रील.
- लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया.
- उपक्रमाचा संक्षिप्त अहवाल, यांचे संकलन करावे.

११) <u>नोडल अधिकारी नियुक्ती:-</u>

प्रत्येक कृषी विद्यापीठाने "सेवा संकल्प अभियानासाठी" एक नोडल अधिकारी नियुक्त करावा. नोडल अधिकाऱ्याची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे राहतील :-

- अभियानाचा विद्यापीठस्तरीय कृती आराखडा तयार करणे.
- महाविद्यालये, संशोधन केंद्रे व कृषी विज्ञान केंद्रांशी समन्वय साधणे.
- जिल्हा प्रशासन व कृषी विभागाशी समन्वय साधणे.
- उपक्रमांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.
- छायाचित्रे, व्हिडिओ व यशोगाथांचे संकलन करणे.
- सर्व संस्थांकडून प्राप्त अहवालाचे संकलन करणे.

- विद्यापीठाचा एकत्रित अहवाल महाराष्ट्र कृषी संशोधन व शिक्षण परिषदेमार्फत शासनास सादर करणे.

१२) <u>अहवाल सादरीकरण</u>:-

सर्व अधिष्ठाता/संचालक/प्राचार्य/विभागप्रमुख/कृषी विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक यांनी अभियानांतर्गत राबविलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल विद्यापीठाच्या नोडल अधिकाऱ्यास सादर करावा.

अहवालामध्ये पुढील बाबींचा समावेश असावा :-

| **अ.क्र.** | **उपक्रम** | **दिनांक व ठिकाण** | **सहभागी/लाभार्थी संख्या** | **प्रमुख निष्पत्ती** | **छायाचित्र/ व्हिडिओ** |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |

क) शेतकरी मार्गदर्शन शिबिर

ख) कृषी तंत्रज्ञान प्रात्यक्षिक

ग) नवोपक्रम/स्टार्टअप उपक्रम

घ) स्वच्छता/वृक्षारोपण

ङ) जलसंधारण उपक्रम

च) शासकीय योजना जनजागृती

छ) विद्यार्थी ग्रामभेट

ज) शेतकरी यशोगाथा

झ) "विकसित भारत"विषयी कार्यक्रम

१३) <u>समन्वय व अंमलबजावणी</u>:-

सर्व कृषी विद्यापीठांनी आवश्यकतेनुसार त्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषी विभाग, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व संबंधित शासकीय/अशासकीय संस्थांच्या समन्वयाने उपक्रम राबवावेत. उपक्रम हे शेतकरी-केंद्रित, परिणामकारक, स्थानिक गरजांवर आधारित व मोजता येण्याजोग्या निष्पत्तींवर आधारित असावेत.

२. सदर अभियानांतर्गत आधीपासून सुरू असलेल्या विस्तार शिक्षण व जनजागृती कार्यक्रमांशी समन्वय साधून कार्यवाही करावी व अनावश्यक पुनरावृत्ती टाळावी. तसेच, वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल यादृष्टीने कार्यवाही करावी. महाराष्ट्र कृषी शिक्षण संशोधन परिषद, पुणे यांनी या अभियानांतर्गत राबवावयाच्या कार्यक्रमांबाबत सर्व कृषी विद्यापीठाशी समन्वय साधावा.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०९१७१२०२३३६२४६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf Dept, 2.5.4.20=B693D975FFFC642FE6B87C2CE9E1297FD1E8BDA9B459F85F75F15 9984BA680FD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54 483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.09.17 12:03:59 +05'30'

**(प्रतिभा पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
३) कुलगुरु/कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी,अहिल्यानगर,
४) कुलगुरु/कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली,
५) कुलगुरु/कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठा,अकोला,
६) कुलगुरु/कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी,
७) संचालक, विस्तार शिक्षण, सर्व कृषी विद्यापीठे.
८) संचालक, संशोधन, सर्व कृषी विद्यापीठे.
९) सर्व अधिष्ठाता, कृषी महाविद्यालये.
१०) सर्व संचालक/विभागप्रमुख, संशोधन केंद्रे, सर्व कृषी महाविद्यालये.
११) सर्व कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्रे, सर्व कृषी महाविद्यालये.
१२) निवड नस्ती, कार्यासन- ६ ए

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
# कृषि नगर, अकोला ४४४ ००१

जा. क्र. साप्रवि/ सेवासंकल्प/अभियान/ २५८९/२०२६

दि २१/०९/२०२६

**वाचा** - शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१५२५/प्र.क्र.१९९/१६ अ (ई-१८५२२४३) दिनांक १७ सप्टेंबर २०२६.

**प्रस्तावना -**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत "सेवा संकल्प अभियान" राबविण्यात येत आहे.सदर अभियान विद्यापीठ स्तरावर प्रभावीपणे राबविण्यासाठी व समन्वय साधण्यासाठी "नोडल अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्याबाबत सदर शासन परिपत्रकामध्ये नमुद करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला चे सेवा संकल्प अभियानाचे नोडल अधिकारी नियुक्त करण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश:-**

उपरोक्त पार्श्वभुमीचे अनुषंगाने असे आदेशित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत "सेवा संकल्प अभियान" राबविण्यात येत आहे.सदर अभियान विद्यापीठ स्तरावर प्रभावीपणे राबविण्यासाठी व समन्वय साधण्यासाठी "नोडल अधिकारी" म्हणून **डॉ. यु. आर. चिचंमलातपुरे, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी, विस्तार शिक्षण संचालनालय डॉ. पं.दे.कृ.. अकोला** यांची नियुक्ती करण्यात येत आहे. तसेच त्यांची प्रमुख कार्ये व जबाबदाऱ्या संदर्भीय् शासन परिपत्रकामध्ये अनु क्र ११ मध्ये विनिर्दिष्ठ केल्याप्रमाणे राहतील.

उपरोक्त आदेश विद्यापीठ हितार्थ निर्गमित करण्यात येत असून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

मा. कुलगुरु महोदय यांचे मंजुरीने निर्गमित.

**स्वा/-**
प्रिती रोडगे,
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**प्रतिलिपी** - डॉ. यु. आर. चिंचमलातपुरे, नोडल अधिकारी, तथा मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी, विस्तार शिक्षण संचालनालय डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांना माहीती व पुढील उचित कार्यवाहीकरीता.

प्रतिलीपी माहीती व उचित कार्यावहीकरीता.

१. संचालक शिक्षण /संशोधन/विस्तार शिक्षण डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
२. अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व)--------------------------------------------------------
४. विभाग प्रमुख (सर्व)------------------------------------------------ डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
५. प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय, (सर्व) ----------------------------------------------------
६. प्रभारी अधिकारी कृषि संशोधन केंद्रे (सर्व) ----------------------------------------------
७. वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषि विज्ञान केंद्रे (सर्व) ---------------------------------------
८. नियंत्रक,/विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यार्थी कल्याण अधिकारी. पं.दे.कृ. वि., अकोला.
९. मा. कुलगुरुंचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहीतीकरीता.
१०. उपकुलसचिव आस्थापना / सामान्य प्रशासन विभाग / वि.वि. डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला

उपकुलसचिव (साप्रवि),
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

Order-M (I)

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,

कृषि नगर, अकोला – ४४४ ००४ (महाराष्ट्र)

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

E-Mail: registrar@pdkv.ac.in


तात्काळ/ महत्त्वाचे / जा. क्र. साप्रवि/ सेवासंकल्प/अभियान/बैठक/१५७९/२०२६

<u>सभेची सुचना</u> दिनांक - २१ /०९/२०२६

प्रति -

१. मा. संचालक शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
२. मा. संचालक संशोधन, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
३. मा. संचालक विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

विषय :- दिनांक १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या राज्यव्यापी "सेवा संकल्प अभियान" अंतर्गत...

संदर्भ : शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१५२५/प्र.क्र.१९९/१६ अ (ई-१८५२२४३) दिनांक १७ सप्टेंबर २०२६.

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, शासनाने १७ **सप्टेंबर** ते १७ **ऑक्टोबर** २०२६ या कालावधीत संपूर्ण राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या आदेशान्वये विद्यापीठामध्ये विविध उपक्रम राबवायचे आहेत. संदर्भीय परिपत्रकात कृषि क्षेत्र हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्वाचा आधार असल्याने, राज्यातील कृषि विद्यापीठे, त्यांची संलग्न महाविद्यालये, संशोधन केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे व विस्तार शिक्षण यंत्रणेमार्फत शेतकरी, ग्रामीण युवक, महिला व कृषि क्षेत्राशी संबंधित घटकांपर्यंत कृषि तंत्रज्ञान, शासकीय योजनांची माहिती व विविध सेवा राबविण्याच्या दृष्टीने महत्वाची बैठक मा. कुलगुरु यांचे अध्यक्षतेखाली <u>दिनांक २४ सप्टेंबर, २०२६ वेळ : सकाळी ११.०० वाजता कुलगुरु कार्यालय सभागृहामध्ये</u> सेवा संकल्प अभियानाचं नियोजन केले जाणार आहे.

सदर सभेकरीता अकोला मुख्यालयातील सर्व सहयोगी अधिष्ठाता, विभागप्रमुख यांनी प्रत्यक्ष हजर राहावे. तसेच बाहेरील केंद्रावरील सहयोगी अधिष्ठाता, सहयोगी संशोधन संचालक, योजना प्रमुख, प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय व वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्रे यांना ऑनलाईन हजर राहण्याबाबतच्या सुचना आपल्या नियंत्रण अधिकारी यांचे स्तरावरुन देण्यात याव्यात, त्यासाठी स्वतंत्र लिंक पाठवली जाईल.

मा. कुलगुरु महोदय यांचे मंजुरीने निर्गमित.

सोबत- शासन परिपत्रकाची प्रत

प्रिती रोडगे,
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**प्रतिलिपी** - डॉ. यु. आर. चिंचमलातपुरे, नोडल अधिकारी, तथा मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी, विस्तार शिक्षण संचालनालय डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांना माहीती व पुढील उचित कार्यवाहीकरीता.

**प्रतिलीपी माहीती व उचित कार्यावहीकरीता.**

१. संचालक शिक्षण /संशोधन/विस्तार शिक्षण डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
२. अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व)------------------------------------------------
४. विभाग प्रमुख (सर्व)---------------------------------------- डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
५. प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय, (सर्व) ----------------------------------------------
६. प्रभारी अधिकारी कृषि संशोधन केंद्रे (सर्व) -----------------------------------------